**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शशीकांत नारायण वसगडेकर
अमित अपार्टमेंट, सांभारे रोड,
गावभाग, सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव,**
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७४०/२०१०/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६/१०/२००६ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०/११/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४/०१/२०१० |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०/०२/२०१० |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे दाखल झालेली द्वितीय अपिले, सुनावणी केलेली अपिले व निकाली काढलेल्या अपिलांची संख्या | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शशीकांत नारायण वसगडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, पुणे

खंडपीठ, पुणे, यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, यांचा निर्णय योग्य असून तो कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश साहेबराव भोसले
मु.पो.भोंडवेवाडी, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बारामती,
तहसील कार्यालय बारामती, ता.बारामती, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती,
तहसील कार्यालय बारामती, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश साहेबराव भोसले
मु.पो.भोंडवेवाडी, ता.बारामती, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती,
तहसील कार्यालय बारामती, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२४.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गावकामगार तलाठ्याच्या मालमत्ता विवरणपत्राची प्रत व्यक्तिगत असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती, तहसील कार्यालय बारामती, ता.बारामती, जि.पुणे यानी नाकारली. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बारामती, तहसील कार्यालय बारामती, ता.बारामती, जि.पुणे यांनी त्यांचा निर्णय कायम केला. आपण दि.३१ डिसेंबर २००८ पर्यंतची माहिती मागितली असता सन २००६ पर्यंतची-म्हणजे अपुरी माहिती दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सुरेश साहेबराव भोसले यांनी केली.

शासनाच्या सन १९८६ च्या परिपत्रकानुसार ही माहिती वैयक्तिक स्वरूपाची व गोपनीय असल्यामुळे दिली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती, तहसील कार्यालय बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.पी.बी.भोंग यांनी केले.

शासनाच्या सेवेतील कर्मचारी सार्वजनिक सेवक असल्यामुळे शासनाला त्यांनी सादर केलेल्या मालमत्ता विवरणपत्राची प्रत अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे. अशी सन २००६ मधील माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती, तहसील कार्यालय बारामती, ता.बारामती, जि.पुणे यांनी दिलेली आहे. ऊर्वरित माहिती द्यावी. मात्र संबंधित कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती, तहसील कार्यालय बारामती, ता.बारामती, जि.पुणे यांनी प्राप्त करून

देण्याची अपीलकर्त्याची मागणी योग्य नाही, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती, तहसील कार्यालय बारामती, ता.बारामती, जि.पुणे यांनी आयोगाला २०.६.२०१० पर्यंत सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शशीकांत नारायण वसगडेकर
अमित अपार्टमेंट, सांभारे रोड,
गावभाग, सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव,**
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७४२/२०१०/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २/१२/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४/१२/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४/०१/२०१० |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०/०२/२०१० |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** डिसेंबर २००५ ते नोव्हेंबर २००९ या कालावधीत राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठा मार्फत शास्ती करण्यात आलेल्या अपिलांचा विहित नमुन्यात तपशील | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शशीकांत नारायण वसगडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती

आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, यांचा निर्णय योग्य असून तो कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिल कुंडलीक केंबळे
रा.ब्लॉक नं.१४, समाज सेवा को-ऑप.
हौसिंग सोसायटी, भोसलेवाडी,
कोल्हापूर-३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,**
पुणे विभाग, पी. एम. टी. बिल्डिंग,
स्वारगेट

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,**
कसबा बावडा, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७४९/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६/०५/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९/०२/२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६/०२/२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०/०४/२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६/०५/२००९ |
| ७ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जिल्हा समाज कल्याण अधिकारी कोल्हापूर यांनी दि.८/०५/२००० च्या पत्रान्वये सचिव, समाज कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर केलेल्या अहवालाची छायाप्रत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुनिल कुंडलीक केंबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि. २६/०५/२०१० रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'जन माहिती अधिकारी यांनी मी मागणी

केलेली माहिती दि.२१/०५/२०१० रोजी समाधानकारक दिली असून, माझी कोणतीही तक्रार/हरकत राहिलेली नाही, तरी सदरचे अपील निकाली काढावे;' असे अपीलकर्ता श्री केंबळे यांनी दि.२४/०५/२०१० च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 29 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास सोमा गोर्डे
मु.पो.पिंपरी पेंढार (पोटे आळी)
ता.जुन्नर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सचिव,
बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आळे, ता.जुन्नर, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** प्राचार्य,
बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आळे, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०८.०४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विलास सोमा गोर्डे
मु.पो.पिंपरी पेंढार (पोटे आळी)
ता.जुन्नर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** सचिव,
बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आळे, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.डी.बी.दाते

**जन माहिती अधिकारी तथा** प्राचार्य,
बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आळे, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.आर.बी.भिसे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.०७.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३१.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.०१.२०१० |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

प्राध्यापकांनी विहित नमुन्यात भरुन दिलेल्या पत्रकांच्या सन १९९७-९८ ते २००८-०९ या काळातील प्रती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.आर.बी.भिसे यांनी दिल्या नाहीत. अन्य ठिकाणाहून माहिती आपण प्राप्त करुन घेतली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विलास सोमा गोर्डे यांनी केले.

श्री.गोर्डे यांनी नमूद केलेला नमुना विद्यापीठाने अथवा शासनाने दिलेला नाही. प्राचार्यांनी स्वत:च्या वैयक्तिक माहितीसाठी तो केलेला असून कार्यालयीन अभिलेख म्हणून जतन करणे आवश्यक नाही. त्यामुळे ही माहिती उपलब्ध नसल्याचे व अपीलकर्त्यास देता येत नसल्याचे स्पष्ट केले होते, असे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.आर.बी.भिसे व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आळे, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.डी.बी.दाते यांनी नमूद केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. राजेंद्र विठ्ठल वनारसे
४, राजसपुरा पेठ, सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
डाक कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित,
सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५५/२०१०/सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/१२/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/०२/२०१० |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५/०३/२०१० |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सातारा जिल्हा डाक कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित ही सन १९९८ पासून नफा व भेट वस्तू देत नाही, त्याबाबतच्या नियमांची प्रत | |

**विवेचन**

नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला आहे. सबब अपीलकर्ता श्री.राजेंद्र विठ्ठल वनारसे यांनी आयोगाकडे केलेले सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

प्रमाणे :-

## आदेश

काली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. दत्तात्रय सहादू रासकर
घर क्र.२७६३, फुलेनगर पुनर्वसन आगरवाडी,
पो. पाबळ, ता. शिरूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
केडगाव विभाग वीज महावितरण कंपनी,
केडगाव, ता. दौंड, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
उपविभाग शिक्रापूर, वीज महावितरण कंपनी,
ता. शिरूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ७.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. दत्तात्रय सहादू रासकर
घर क्र.२७६३, फुलेनगर पुनर्वसन आगरवाडी,
पो. पाबळ, ता. शिरूर, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
उपविभाग शिक्रापूर, वीज महावितरण कंपनी,
ता. शिरूर, जि. पुणे श्री. व्ही. आर. होनराव

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
केडगाव विभाग, वीज महावितरण कंपनी,
केडगाव, ता. दौंड, जि. पुणे श्री. एस. जी. मोरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.११.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

वीजजोड घेण्याबाबतची डिसेंबर २००५ मधील मूळ कागदपत्रे वारंवार मागणी करूनही दिली जात नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दत्तात्रय सहादू रासकर यांनी केली.

संबंधित कागदपत्रे जतनाच्या कालावधीनुसार ३ महिन्यात नष्ट केली जातात. ५ वर्षांपूर्वीची कागदपत्रे असून मूळ कागदपत्रांची मागणी केली आहे. त्यानुसार माहिती देणे शक्य नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, उपविभाग शिक्रापूर, ता. शिरूर श्री. व्ही. आर. होनराव व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, केडगाव विभाग, वीज महावितरण कंपनी, केडगाव, जि. पुणे श्री. एस. जी. मोरे यांनी केले. संबंधित कागदपत्रांच्या जतनाच्या कालावधीबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नेमका तपशील खात्री करून द्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१ अपील निकाली प्राधिकारी निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या जतनाच्या कालावधीबाबत नेमकी तरतूद जन माहिती अधिकारी श्री. व्ही. आर. होनराव व अपिलीय प्राधिकारी श्री. एस. जी. मोरे यांनी सप्रमाण स्पष्ट करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाला त्वरित सादर करावा.

पुणे
दि. 28 MAY 2010

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

मेजर उदय साठे (सेवानिवृत्त)
'सत्संग', प्लॉट नं.९६,
स.नं.१, वडगांव शेरी,
पुणे-१४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा चिटणीस,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २/०१/२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९/०१/२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८/०२/२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११/०४/२००७ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वडगांव शेरी, पुणे येथील सर्वे नं.१ मधिल भूखंड क्र.१०७ हा श्री.ए.एम.गोखले यांना वाटप केले संदर्भातील माहिती | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.११/०६/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता मेजर उदय साठे यांना कार्यालयात उपलब्ध असणाऱ्या संचिका व कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात आली होती व त्यांच्या सूचनेप्रमाणे त्यातील काही कागदपत्रांच्या छायाप्रती देखील देण्यात आलेल्या आहेत. तथापि अपीलकर्ता मेजर साठे यांचे मागणीप्रमाणे स.नं.१ मधील भूखंड क्र.१०७ हा श्री. ए.एम.गोखले यांना वाटप केल्यासंदर्भातील सन १९८१-८२ सालची संचिका वारंवार शोध घेऊनही उपलब्ध झाली नसल्याने देता आली नाही. यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे', असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.दादाभाऊ जोशी व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे श्री.चिंतामणी जोशी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) संचिका प्रकरणी करण्यात येणाऱ्या विभागीय चौकशीच्या सद्यस्थितीची माहिती/अहवाल अपीलकर्त्यास नि:शुल्क पुरवून जन अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी अनुपालन अहवाल आयोगास दि.२०/०६/२०१० पर्यंत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबासाहेब वामन शिंदे
पाखडी, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, बारामती, ता.बारामती, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत पारवडी, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाबासाहेब वामन शिंदे
पाखडी, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.ए.एस.शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत पारवडी, ता.बारामती, जि.पुणे श्री.आर.एन.गावंड

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.७.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

इंदिरा आवास योजनेतील घरकुलांबाबतची चुकीची माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पारवडी, ता.बारामती, जि.पुणे यांनी दिली. गेली दहा वर्षे आपले नाव दारिद्र्यरेषेखाली असूनही आपल्याला घरकुल दिलेले नाही. मात्र मयत व्यक्तींना प्रतीक्षा यादीत घर दिले. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पारवडी, ता.बारामती, जि.पुणे यांच्या घरातील तीन व्यक्तींना घरकुल दिले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.बाबासाहेब वामन शिंदे यांनी केली.

अपीलकर्ता श्री.शिंदे यांनी सुशिक्षित बेकार असताना दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींचे सर्वेक्षण केले. त्यात तयार झालेल्या यादीनुसारच ग्रामपंचायतीत ठरल्याप्रमाणे प्रतीक्षा यादी मंजूर झाल्यावर घरे दिली आहेत. कोणाही मयत लाभार्थीला घर दिलेले नाही. अपीलकर्त्याचे नाव प्रतीक्षा यादीत नव्हते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पारवडी, ता.बारामती, जि.पुणे श्री.आर.एन.गावंड यांनी केले.

मूळ सर्वेक्षण झाल्यानंतर सध्याचे ग्रामसेवक रूजू झालेले आहेत. घरकुल वाटपाबाबत नमुना सर्वेक्षण करून चौकशी सुरू करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, बारामती, ता.बारामती, जि.पुणे श्री.ए.एस.शिंदे यांनी केले.

अपीलकर्त्याची घरकुलाची मागणी व घरकुल वाटपातील गैरव्यवहाराची तक्रार या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत. मात्र घरकुलाबाबतचे प्रस्ताव, यादी आदी माहिती अपीलकर्त्यास दिली गेली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री बिरा बापू पाटील
मु तिसंगी, पो. सोनके,
ता. पंढरपूर, जि सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
अधिक्षक अभियंता,
सिंचन भवन, पुणे मंडळ,
(निरा उत्तर कालवा) विभाग,
मंगळवार पेठ, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
मुख्य कार्यकारी अभियंता,
निरा उजवा कालवा विभाग,
फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९७/२०१०/सोलापूर |
| ५ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.३.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१०.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** एकूण क्षेत्र ०/५६ आर च्या पाणीपट्टीबाबतची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बिरा बापू पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीमध्ये नमूद केलेल्या ९० दिवसांच्या विहित मुदतीत केले

नसल्याने मुदतबाहय आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 26 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. मधुकर निवासराव पाटील
मु.पो.कापूसखेड, ता. वाळवा, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
वाळवा, इस्लामपूर, जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
वाळवा, इस्लामपूर, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०१ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १७.४.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाळवा, इस्लामपूर, जि. सांगली तर्फे प्रतिनिधी श्रीमती जयश्री अमृतसागर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाळवा, इस्लामपूर, जि. सांगली तर्फे प्रतिनिधी श्री. यु.एस.मधाळे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.९.२००८, २४.१०.२००८, २०.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.१२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. मधुकर निवासराव पाटील यांनी दि. १६.९.२००८ रोजी माहिती मागणारा अर्ज केला होता. दि. २९.९.२००८ रोजी त्यांना शुल्क कळविले. शुल्क भरल्याचे चलन त्यांनी दि. १५.१०.२००८ रोजी सादर केले. माहिती टपालाने न पाठविता समक्ष घेऊ, असे त्यांनी सांगितले होते. त्यानुसार दि. २४.१०.२०१० रोजी माहिती तयार ठेवली होती, परंतु ते न आल्यामुळे दि. ६.१०.२००८ व दि. ११.११.२००८ रोजी माहिती नेण्याबाबत दूरध्वनीवरून त्यांना सांगितले. तरीही ते आल्यामुळे दि. २०.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये पोस्टाचा दाखला घेऊन माहिती त्यांना पाठविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाळवा, इस्लामपूर यांचे प्रतिनिधी श्री. यु.एस.मधाळे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विनायक रघुनाथ चव्हाण
कार्यकारी संचालक,
श्री सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., वसंतदादा पाटील मार्ग,
कर्मवीर भाऊराव पाटील चौक, सांगली .. **अपीलकर्ता**

सौ. राधिका माणिकराव पाटील .. **मूळ अर्जदार**
रा. रेठरे धरण, ता. वाळवा, जि. सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
कुबेरा चेंबर्स, वखार भाग, महावीरनगर, सांगली-४१६ ४१६ .. **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा श्री कार्यकारी संचालक,
सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., वसंतदादा पाटील मार्ग,
कर्मवीर भाऊराव पाटील चौक, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०२ + ११४१ /२००९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १७.४.२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**अपीलकर्ता -** श्री. विनायक रघुनाथ चव्हाण<br>कार्यकारी संचालक,<br>श्री सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., वसंतदादा पाटील मार्ग,<br>कर्मवीर भाऊराव पाटील चौक, सांगली तर्फे प्रतिनिधी श्री. जी.एस.राऊत<br>सौ. राधिका माणिकराव पाटील - मूळ अर्जदार<br>रा. रेठरे धरण, ता. वाळवा, जि. सांगली<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>कुबेरा चेंबर्स, वखार भाग, महावीरनगर, सांगली-४१६ ४१६<br>श्रीमती जयश्री अमृतसागर | |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ७.७.२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराची तारीख | ३०.७.२००८, १०.२.२००९, ७.३.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | २२.८.२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | २८.९.२००८ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्त्या सौ. राधिका माणिकराव पाटील यांनी त्यांच्या सास-यांच्या कर्जमाफी संदर्भात दि. ७.७.२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली यांच्याकडे माहिती मागितली होती. विविध कार्यकारी संस्थेकडील ही माहिती व बँकेकडील सर्व माहिती दि.३०.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली यांनी निःशुल्क दिली. परंतु माहिती अपुरी व चुकीची असल्याच्या कारणावरुन सौ. पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिका-यांनी अपील फेटाळले. परंतु 'संबंधित कर्जदारांचे जिंदगी पत्र व क.म. पत्रक इ. महसुली अभिलेखांची पडताळणी करुन संपूर्ण कर्जाबाबतची सखोल चौकशी शाखा इन्सपेक्टर यांनी करुन कर्जमाफी प्रकरणी योग्य तो निर्णय घेऊन आवश्यक कागदपत्रांच्या निकालासह सौ. पाटील यांना कळवावे,' असा आदेश अपिलीय प्राधिका-यांनी दिला. त्या अनुषंगाने सौ. पाटील यांनी माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र. ११४१ दाखल केले आहे व अपिलीय प्राधिका-यांनी अपील फेटाळताना दिलेला आदेश माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत होऊ शकत नसल्यामुळे तो रद्द करावा, या मागणीसाठी मूळ प्रकरणातील जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली श्री. विनायक रघुनाथ चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र. ८०२ दाखल केले आहे.

आपल्याला दिलेली माहिती चुकीची आहे. जिंदगी पत्रक व क.म. पत्रक खोटे बनविले आहे, अशी तक्रार सौ. पाटील यांनी केली व आपल्या सासऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळून पूर्ण 'कर्ज फिटल्याचा दाखला' देण्याचा आदेश जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली यांना द्यावा, अशी मागणी केली.

सौ. पाटील यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत निःशुल्क दिली आहे. बँक ही सहकारी संस्था असून मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रिट पिटीशन

क्र.१३०४/२००८ मध्ये फेब्रुवारी २००९ मध्ये, तसेच मुंबई उच्च न्यायालयाने रिट पिटीशन नं.८३८२/००८ मध्ये दि. ८ डिसेंबर २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार सहकारी संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. या आदेशानुसार आपल्या बँकेला हा कायदा लागू होत नाही, तरीही माहिती दिली आहे. जिंदगी पत्रक व क.म. पत्रक या संदर्भातील सौ. पाटील यांचे आक्षेप व पाच एकरपेक्षा कमी क्षेत्र असल्यामुळे कर्जमाफी मिळण्याची त्यांची मागणी या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत. तरीही अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांनी प्रशासकीय कार्यवाहीचे आदेश दिले असून ते रद्द व्हावेत, अशी मागणी मूळ प्रकरणातील जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली यांचे प्रतिनिधी श्री. जी. एस. राऊत यांनी केली.

बँकेने अपीलकर्त्या सौ. पाटील याना विहित मुदतीत माहिती व उत्तर दिले आहे. त्यांच्या अन्य मागण्या व आक्षेप या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत. या स्थितीत अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांनी दिलेले आदेश प्रशासकीय कार्यवाहीचे असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा समावेश होत नाही. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील क्र. ११४१ अमान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्र. ८०२ मान्य करण्यात येत असून अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांचे आदेश रद्दबातल ठरविण्यात येत आहेत.

पुणे
दि. 26 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. देवेंद्र काशिनाथ सहस्त्रबुध्दे
अवधुत, सावरकर कॉलनी, मार्ग क्र.२,
विश्रामबाग, सांगली - ४१६ ४१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, सांगली, मिरज
आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
पाणी पुरवठा विभाग, सांगली, मिरज
आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०८ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १७.४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>पाणी पुरवठा विभाग, सांगली, मिरज<br>आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. एस. बी. पाटील | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.८.२००७, २१.५.२००८, १६.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.४.९.२००७, ६.६.२००८, २५.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.८.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १७.४.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

सांगली शहरातील विश्रामबाग उपनगराला पाणी पुरवठा करण्यासंदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री. देवेंद्र काशिनाथ सहस्त्रबुध्दे वेळोवेळी मागत आले आहेत, त्या त्या वेळी त्यांना ती देण्यात आली आहे. प्रस्तुत अपिलातील माहिती विहित मुदतीत देण्यात आली असून पाणी पुरवठाही सुरळितपणे सुरु करण्यात आला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. एस. बी. पाटील यांनी केले.

अपीलकर्ता श्री. सहस्त्रबुध्दे सातत्याने याच विषयाचा पाठपुरावा करीत असून त्यांची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे, ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि.** 26 MAY 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश तुकाराम कारले
६५५/५, विसावा कॉम्प्लेक्स, विमाननगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१ / २०१० |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश तुकाराम कारले
६५५/५, विसावा कॉम्प्लेक्स, विमाननगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे श्री.व्ही.पी.पाटील

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे श्री.जे.एच.निंबाळकर | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.८.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.उत्तर दिले नाही. |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.१०.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन १९८४ मध्ये झालेल्या फेरफाराच्या संदर्भातील माहिती तहसीलदार, हवेली यांच्याकडून प्राप्त करून देण्याचा आदेश तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, हवेली व अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांनी माहितीच्या अधिकारातील अन्य अर्जावर आपल्याला दिला. त्यानुसार आपण जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे यांच्याकडे फाळणीबारा उताऱ्याच्या मागणीसाठी अर्ज केला असता संबंधित कागदपत्रे आढळून येत नसल्याचे त्यांनी कळविले. माहिती १५ दिवसांत नि:शुल्क देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे यांनी देऊनही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रमेश तुकाराम कारले यांनी केली.

७/१२ उताऱ्यावर क्षेत्र कमी झाल्याची अपीलकर्त्याची मुख्य तक्रार आहे. त्याबाबत क्षेत्र दुरूस्तीसाठी त्यांनी भूमी अभिलेख विभागाकडे दाद मागावी, असे त्यांना स्पष्ट केले आहे. संबंधित कागदपत्रे आढळून येत नसल्यामुळे देता आले नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे श्री.जे.एच.निंबाळकर यांनी केले.

संबंधित प्रकरणाचा अभिलेखात शोध घेऊन कायमस्वरूपी जतनाची असलेली फेरफार प्रकरणातील आदेशाची प्रत अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे यांनी २०.६.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. गौतम मारूती गुरव
गुरूवार पेठ, दर्गाह रोड, ता. मिरज,
जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाज कल्याण
अधिकारी, सांगली, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १७.४.२०१० |
| ३ | **उपस्थित -**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे श्री. उमाकांत कांबळे<br>**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सांगली, जि. सांगली श्री. डी. बी. घाटे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.११.२००८, ३०.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.१०.२००८ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.गौतम मारूती गुरव यांनी स्वतःच्या एन.टी. फ्री शिपच्या अनुषंगाने मागितलेली माहिती संबंधित महाविद्यालयाच्या स्तरावरील असल्याने त्यांच्याकडून घेण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. तसेच त्यांचे देयक सादर करण्याबाबतच्या प्रशासकीय प्रक्रियेबाबतही महाविद्यालयास विचारणा केली. संबंधित देयक प्रलंबित असल्याचे कळवून महाविद्यालयाने आपल्या कार्यालयाकडे पाठविले, त्याची प्रत श्री. गुरव यांना दिली व देयक पारित करण्याबाबतच्या कार्यवाहीचीही माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सांगली श्री. संभाजी आ. धोत्रे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता माहितीबरोबरच प्रशासकीय कार्यवाहीही जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सांगली श्री. डी. बी. घाटे यांनी केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 26 MAY 2010